## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी - **उत्तरवादी**

## अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ८०८/नाग/२०१०**

१. श्री विजय मारोतीराव धनवटे - **अपीलकर्ता**
राजमाचि, प्लॉट नं. ६१/६२, रामदासपेठ, नागपूर
ता.जि. नागपूर - १०

**विरुध्द**

२.
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (राजस्व विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सिव्हिल लाईन्स् नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हयात ता. कळमेश्वर, मौजा - चिचभुवन या ग्रामिण भागातील २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ या कालावधीकरीता महसुल वर्ग-१ च्या जमिनीचे महसूल कर (अकृषक कर व त्यावर ग्रामपंचायत सेस) काय निश्चित करण्यात आले होते हे कळवावे. तसेच त्या बद्यल शासन निर्णय / परिपत्रकाची मागणी केलेली आहे व माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ३१/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २९/०४/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी यांनी वर्ग - १ च्या गावासाठी ठरविण्यात आलेल्या प्रमाणित दराच्या रकमेबाबतची माहिती अपीलार्थीस ७ दिवसाचे आत निशुल्क देण्यात यावी असा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. त्यानुसार अपीलकर्ता यांना दि. ०५/०६/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या अर्जा प्रमाणे माहिती त्यांना मिळालीच नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही. परंतू अपीलकर्ता यांना जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील आवक लिपीकाने तशी पोच दिली आहे व त्यामुळे सदरच्या अर्जाची नोंद आवक नोंद वहीत झाली असली पाहिजे व तो अर्ज संबंधीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे पोहचविणे ही संबंधीत कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे. जिल्हाधिकारी कार्यालय व उपजिल्हाधिकारी कार्यालय हे संपूर्ण एकच कार्यालय आहे. व त्यामुळे एखाद्या बाबत माहिती पोहचविण्याची जबाबदारी माहिती अधिकाऱ्यावर असल्यास माहिती अधिकारी हे त्यांचे कार्यालयात त्यांचे पर्यंत माहिती पोहचवीली नाही असे कारण देऊ शकत नाही. तसे असल्यास संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी किंवा सक्षम अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित करुन त्या कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही करुन आयोगापुढे सुनावणीस उपस्थित झाले पाहिजे. यासाठी जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अधिनियमाचे कलम (४) प्रमाणे दुसऱ्या कर्मचाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे सहाय्य घेता येते व ज्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम २००५ (५) अन्वये जनमाहिती अधिकारी समजण्यात येते. त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक राहील. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्याने अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी दि. १७/०२/२०१० च्या अर्जाची नोंद आवक वहीत केल्यानंतर त्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी ही निश्चित करावी. यासंबंधीत कर्मचाऱ्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत असून त्यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८१५/नाग/२०१०</u>**

१. श्री राजू किसनराव पुन्नमवार - **अपीलकर्ता**
रा. नवेगांव (मुरखळा) पो. मुडझा
ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (बांधकाम विभाग), गडचिरोली
ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (बांधकाम विभाग), गडचिरोली
ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर असून त्यांनी निवेदन दिले आहे. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे कनिष्ठ अभियंता श्री जाधव हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (बांधकाम विभाग), गडचिरोली यांचेकडे अर्जदाराचे भविष्य निर्वाह निधी सी.पी.एफ. क्र. ०१३७६५०० या खात्यात जमा असलेल्या रकमेच्या सत्यप्रती पुरविण्याबाबत विनंती केली आहे असे दिसते. माहितीचा कालावधी सन १९७८-८० ते अद्यावत असा दिलेला आहे. माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १९/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०१/०७/२०१० रोजी देण्यात आला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळाली आहे ती अपूर्ण आहे. १) सन १९७८ ते १९८२ पर्यंत कार्यरत असल्यामुळे कामाच्या मस्टरची प्रमाणीत प्रत उपलब्ध करुन देणे, २) सन १९८१ नंतर माझ्या कनिष्ठ सहकाऱ्यांना कामावर नियमीत करण्यात आले त्या आदेशाची प्रत, ३) सन १९७८ ते १९८२ पर्यंत ज्या वाढी झाल्या त्या वाढींची थकीतबाकी मला अजून मिळाली नाही ती मिळावी, ४) भविष्य निर्वाह निधी कपात झालेल्या रकमेच्या संपूर्ण महिनावार तपशिल मला मिळावा, ५) भविष्य निर्वाह निधीचे साधे स्टेटमेंट मला आता देण्यात आले आहे त्यात रक्कम ३२८९ जमा असल्याचे नमुद आहे. हे पत्र दिनांक ०९/०७/२०१० ला प्राप्त झाले. सदर रक्कम १९८० पर्यंतची असल्यामुळे व ति आजतागायत मला अदा न होता शासकीय कार्यालयातच जमा आहे. ती आजपर्यंतच्या वाढीव दराच्या व्याजासहीत मला मिळावी. अशी अपीलकर्ता यांनी एकूण ५ मुद्यांवर माहितीची आयोगापुढे मागणी केलेली आहे.

४. अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये भविष्य निर्वाह निधी मध्ये कपात झालेल्या रकमेच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग गडचिरोली यांचेकडील मागितलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी ज्या कालावधीतील माहिती मागितलेली आहे ती माहिती वरोरा विभागातील आहे. गडचिरोली विभागातील नाही. त्यामुळे सदरची माहिती ही वरोरा विभागाकडे असण्याची शक्यता आहे. सदर माहिती अपीलकर्ता यांनी वरोरा कार्यालयातील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी वरोरा विभाग यांचेकडे मागणे संयुक्तिक झाले असते. असे असले तरी सदरची माहिती ही संगणकामध्ये उपलब्ध असून ही माहिती मुंबई येथील कार्यालयातील असल्यामुळे उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली. अपीलकर्ता यांची इतर जी संपूर्ण मागणी आहे त्यांनी ती वरोरा कार्यालयाकडे तक्रार करणे आवश्यक राहील व त्या तक्रारीच्या कार्यवाहीची माहिती त्यानुसार माहितीच्या अधिकारात मागणे संयुक्तिक

राहील. मात्र अपीलकर्ता यांना त्यांचे दि. ०८/०३/२०१० च्या अर्जा प्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्याने सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ८११/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विरेन्द्र गजानन दहिकर<br>२३९, चॉक्स कॉलनी, कामठी रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर - १४ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला<br>बांधकाम भवन, गोरक्षण रोड,<br>ता. जि. अकोला | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला<br>ता. जि. अकोला | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १२/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सहाय्यक अधिक्षक अभियंता श्री जी.एस. एनकर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०६/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी पी.डी. नवघरे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अकोला, यांचेकडे खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

१. आपल्या विभागात असलेले कार्यकारी अभियंता व उपविभागात असलेले उपविभागीय अभियंता यांची सरकारी सेवेत रुजू झाल्यापासून ते ३१ मार्च २००९ पर्यंतची 'जॉब चार्टची' माहिती पुरविणे.

२. आपल्या विभागात व आपल्या विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत १ जानेवारी २००७ ते ३१ मार्च २००९ पर्यंतच्या कालावधीत आलेले माहितीचे अर्ज व तक्रारी अर्जाची सत्यप्रत पूरविणे.

३. सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८ या कार्यकाळात आपल्या विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व उपविभागामध्ये कोणकोणती कामे कशा कशा पध्दतीने करण्यात आली या संबंधीचे निविदा पासून ते देयक वितरीत करण्यापर्यंतची तपशिलवार माहिती पूरविणे तसेच प्रत्येक कामाची तपासणी ज्या - ज्या उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता यांना देण्यात आली त्याची नावे व भ्रमणध्वनी क्रमांकची माहिती पूरविणे.

४. सन २००५-०६, २००६-०७, २००७-०८ या कार्यकाळात सुरु असलेल्या कामाची प्रगती व करारनामा झाले परंतु प्रत्यक्ष सुरु न झालेल्या कामाबाबत कारणे व सविस्तर माहिती पूरविणे.

५. निविदा प्रक्रियेला बगल देवून व शासकीय मोठ्याकामांचे लहान लहान तुकडे करुन ॲडजेस्टमेंट पध्दतीचा अवलंब करुन मोठया कामाचे लहान तुकडे करुन पन्नास हजार रुपयाच्या आतील रकमेचे करारनामे करुन उपरोक्त कालावधीमध्ये जी - जी कामे केली गेलीत त्या संबंधीची करारनाम्यासह सविस्तर तपशिलवार माहिती देण्यात यावी.

सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २७/१०/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ३०/१२/२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस मूळ अर्जाबाबत विचारणा केली असता अर्जदाराने फक्त दि. १३/०६/२००९ च्या डाकघराच्या यू.पी.सी. ची पावती दाखविली (अर्जावर त्यांनी दि १७/०६/२००९ तारीख टाकलेली दिसून येते) अर्जदार मूळ अर्जाच्या छायांकित प्रती सादर करु शकले नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना ३० दिवसात माहिती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. शक्यता असल्यास त्यांच्या निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी याबाबत कार्यकारी अभियंता यांना आदेशित केले. व सदर निर्णय अपीलकर्ता यांनी मान्य केला असून तसे लेखी सुध्दा दिले आहे. त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे

सांगितले की, त्यांना माहितीचे निरिक्षण करण्याकरीता बोलविण्यात आले नाही. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता त्यात ३० दिवसाचे आत निरिक्षण करावे असे दिले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनीच स्वतः हजर होवून निरिक्षण करुन घेणे आवश्यक होते. परंतू अपीलकर्ता यांनी तसे न करता दि. १३/०२/२०१० रोजी सभ्यतेच्या मर्यादा सोडून जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे विरुध्द अर्ज केलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना काय अपेक्षित आहे हे दिसून येते. तसेच त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरच्या अर्जामध्ये कोणत्याही कागदपत्रांचे निश्चित वर्णन केले नाही, कोणत्याही प्रकल्पाचे निश्चित वर्णन केले नाही. व मोघम स्वरुपात ३ ते ४ वर्षाची माहिती मागितलेली दिसून येते. त्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे पृष्ठ हे १ लाखापेखा जास्त प्रतींच्या माहितीचे होवू शकतात. त्यामुळेच ते उपलब्ध करुन देण्याकरीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा या प्रमाणाबाहेर राबवावी लागणार आहे. व तरीही अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्यामुळे ती पूरविणे शक्य होणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती व माहितीचा अधिकार या दोन व्याख्यांप्रमाणे अर्जदाराने माहिती मागणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय हा सुध्दा योग्यच आहे. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून तसेच निश्चित प्रकल्पाचे किंवा कागदपत्रांचे निरिक्षण करुन व कालावधी देवून आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेणे संयुक्तिक राहील. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..................दिनांक .....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ८२५/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री लस्मय्या राजम नागुला<br>वन परिक्षेत्र कार्यालय, नागभीड<br>मु. पो. ता. नागभीड जि. चंद्रपूर - ४४१२०५ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर - ४४२४०१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर - ४४२४०१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १३/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, चंद्रपूर यांचेकडे एकूण ११ व्यक्तींची माहिती मागितलेली दिसून येते. सदर व्यक्तींचे जातीच्या प्रमाणपत्रांच्या संदर्भात तसेच सिरोंचा गावातील जनगणना करणाऱ्या अधिकाऱ्यांना घरनिहाय व कुटुंब निहाय जातींची माहिती मागितली असून त्यात जानेवारी २००१ ते भटक्या विमुक्त या जातीचे वा

ओबीसींचे चंद्रपूर व गडचिरोली या दोन्ही जिल्हयात समाविष्ठ तहसिलनिहाय प्राप्त प्रकरणे किती ? व वैध व अवैध प्रकरणे किती ? सिरोंचा, अहेरी, आलापल्ली, लगाम, बोरी, व गोंडपिपरी या गावातील जात पडताळणीकरीता प्राप्त प्रकरणे किती ? इ. बद्यल माहिती मागितलेली आहे. जात पडताळणी संबंधीचे अधिनयम व नियम या प्रकरणा संबंधी एकूण २४ मुद्यांमध्ये विविध प्रकरणी माहिती मागितलेली असल्याचे दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. ०८/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय चंद्रपूर तसेच विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२ नागपूर विभाग नागपूर हे दोन स्वतंत्र कार्यालय असून आपणास पाहिजे असलेली माहिती संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२ नागपूर विभाग, चंद्रपूर यांचेकडून मिळेल तेव्हा आपण माहितीसाठी वरील पत्त्यावर आपला अर्ज करावा असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दि.१७/०३/२०१० रोजीच्या दि. १२/०३/२०१० च्या अर्जाच्या संदर्भात त्याच प्रमाणे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २०/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. तत्पूर्वी त्यांनी दि. ०६/०३/२०१० रोजी सुध्दा मागितलेली माहिती कोणत्या कार्यालयाशी संबंधीत आहे असे कळविलेले होते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती विविध कार्यालयातील आहे. त्यामुळे त्यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी चंद्रपूर यांनी मागितलेली माहिती कोण-कोणत्या कार्यालयात उपलब्ध होईल असे जे कळविले आहे ते योग्य आहे. एकाच माहितीच्या अर्जामध्ये अनेक प्रकारची माहिती व तीही विविध कार्यालयातील मागता येत नाही. त्यामुळे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी अपीलार्थीस जे कळविले आहे ते योग्य आहे. आज अपीलकर्ता हे ही हजर नाही त्यामुळे पुढील कार्यवाहीवर सुनावणी होवू शकत नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८३५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मो. आरिफ मो. शब्बीर<br>द्वारा अजहर अली, प्लॉट क्र. २६६, सिध्दार्थ नगर, टेका नागपूर<br>ता.जि. नागपूर - १७ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त<br>महानगर पालिका नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशामक अधिकारी<br>अग्निशमन व आणिबाणी सेवा<br>महानगर पालिका नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २२/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख अग्निशामक अधिकारी अग्निशमन व आणिबाणी सेवा महानगर पालिका नागपूर यांना सविता गॅस एजेन्सी (HP Gas) कामठी रोड, ओम गॅस ॲण्ड डोमेस्टीक अपलाईंसेस (Indane Gas) कामठी रोड , धुर्वे गॅस एजेन्सी (Indane Gas) वैशाली नगर, या तीनही एजेन्सीचे गॅस गोडाऊन च्या संदर्भात वर्ष २००९-२०१० मधील NOC व FIRE NOC च्या संबंधीत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही टपालाने घेणार असे नमूद केले आहे. व अपीलकर्ता हे BPL Card धारक आहे असेही नमूद केले आहे.

३.	अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि.०६/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म.न.पा. यांनी गॅस एजेन्सी यांचेकडे NOC करीता अर्ज प्राप्त नाहीत असे कळविले आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. २२/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संबंधीत गॅस एजेन्सी यांनी NOC च्या प्रती करीता त्यांच्याकडे अर्ज केला नसल्यामुळे NOC च्या प्रती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्ता यांना कळविले आहे. मात्र यानंतर NOC घेण्याकरीता त्यांना नोटीस काढण्यात आले आहे. त्या नोटीस च्या संदर्भात माहिती मागितलेली नसल्याने व मागितलेली माहिती मिळालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८८०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जी. झेड. तेलंग<br>मु. पो. वायगांव (निपाणी)<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)<br>जिल्हा परिषद वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>पंचायत विभाग, जि | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्राधिकार पत्र दिले आहे व त्यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत विभाग जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१. माझे वैयक्तिक नस्तीमधील दि. ०१/०७/२००९ ते २७/०२/२०१० पर्यंत टिपणी (File Noting) ची झेरॉक्स प्रत.

२. मा. विभागीय आयुक्त, नागपूर ह्यांनी पत्र क्र. वि. शा. कार्या ११ (टे) का वि ४४८/२००९ दि.२२/०६/२००९ नुसार व्याज देण्यासाठी आदेश होवून सुध्दा विलंब का लागत आहे त्याची कारणे व अपील केलेल्या कार्यवाहीच्या झेरॉक्स प्रती.

३. मु. का. अ. जि. प. वर्धा /जिपव/ ग्रा. पं. पेन्शन /वा श/ १०४२/०६ मध्ये माझे कडे रु.३९५५७/- ची मुल्यांकन वसुली दर्शविली होती ती श्री नांदे ह्यांचे काळातील असल्याने ह्यांचे कडून कधी वसुल केली त्या आदेशाची झेरॉक्स प्रत.

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. २६/०३/२०१० रोजी व्याज प्रदानाबाबतची कार्यवाही चालू आहे व्याजाबाबत जबाबदार अधिकारी / कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येत आहे. त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर नियमानुसार व्याज वसुलीची कार्यवाही त्यांचेकडून करण्यात येत आहे. सद्यस्थितीत नस्ती वित्त विभाग, जि. प. वर्धा मार्फत मा.मु.का.अ.जि.प. वर्धा कडे सादर केली आहे. नस्ती प्राप्त झाल्यानंतर मागितलेली माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. २३/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २०/०५/२०१० रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरा प्रमाणेच निर्णय देण्यात आलेला आहे. त्यामुळे माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अर्ज केला त्या वेळेस व प्रथम अपीलाच्या वेळेस संबंधीत नस्ती ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडेच उपलब्ध असल्याने माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतू आता सदरची नस्ती उपलब्ध झालेली आहे त्यामुळे माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना आयोगाचे कार्यालयातच माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिति आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८८१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भगीरथ दलीरामजी नागलवाडे<br>१८, गुजराथी कॉलनी, गणेशपुर, भंडारा<br>ता.जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>एम. आय. डी. सी. नागपूर<br>उद्योग भवन सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>एम. आय. डी. सी. नागपूर<br>उद्योग भवन सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत व माहिती मिळाल्याचे निवेदन दिले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १६/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. दि. २२/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी MIDC देवरी जि. गोंदिया येथील प्लॉट वाटप झाल्याच्या संबंधीत प्रथम अपील करुन माहिती मागितली होती. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती आज दि. १७/०७/२०१० ला त्यांना मिळाली आहे. याबाबत अपीलकर्ता यांची कोणतीही तक्रार नाही असे त्यांनी लेखी निवेदन दिले आहे. सबब अपील हे अपीलकर्ता मागे घेत आहेत. त्यामुळे हे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील. अपील क्र. ८५४/नाग/२०१०, अपील क्र. ८७५/नाग/२०१०, अपील क्र. ८७६/नाग/२०१०, अपील क्र. ८७७/नाग/२०१० अपील क्र. ८७८/नाग/२०१० अपील क्र. ८७९/नाग/२०१०**

**अपील क्र. ८५४/नाग/२०१०**

१. श्री शैलेश देविदास निनावे - **अपीलकर्ता**
C/o, श्री जी. आर. सोरते मु. पो. रोहना
ता. आर्वी जि. वर्धा

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा

**अपील क्र. ८७५/नाग/२०१०**

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय मुंबई - ३२

५. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव - **उत्तरवादी**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय मुंबई - ३२

**अपील क्र. ८७६/नाग/२०१०**

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसचिव
आदिवासी विकास विभाग
मंत्रालय मुंबई - ३२

७. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी - **उत्तरवादी**
आदिवासी विकास विभाग
मंत्रालय मुंबई - ३२

**<u>अपील क्र. ८७७/नाग/२०१०</u>**

८. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संशोधन अधिकारी
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११००१

९. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव - **उत्तरवादी**
समन्वय कक्ष, का-३ , आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११००१

**<u>अपील क्र. ८७८/नाग/२०१०</u>**

१०. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
अनुसुचित जमाती जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,
आदिवासी भवन, गिरीपेठ नागपूर

११. जन माहिती अधिकारी - **उत्तरवादी**
अनुसुचित जमाती जाती प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय,
आदिवासी भवन, गिरीपेठ नागपूर

**<u>अपील क्र. ८७९/नाग/२०१०</u>**

१२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल)
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

१३. जन माहिती अधिकारी तथा सिरस्तेदार - **उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी कार्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक १७/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ८५४/नाग/२०१०, अपील क्र. ८७५/नाग/२०१०, ८७६/नाग/२०१०, ८७८/नाग/२०१०, ८७९/नाग/२०१० मध्ये दि. ०९/०६/२०१० रोजी व अपील क्र. ८७७/नाग/२०१० मध्ये दि. १०/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना अपील क्र. ८५४/नाग/२०१० मध्ये दि.

१७/०६/२०१० रोजी  नोटीस पाठवून दि. १५/०७/२०१० रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले परंतू त्यांना अपघात झाल्यामुळे पुढील मुदत मिळावी म्हणून तारीख मागितली होती ती त्यांना आज दि.१७/०७/२०१० रोजी देण्यात आली होती. इतर सर्व अपील प्रकरणात अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपील क्र. ८७५/नाग/२०१० व अपील क्र. ८७६/नाग/२०१० मध्ये उत्तरवादी यांनी पावसाळी अधिवेशन असल्यामुळे मुदत मागितलेली आहे. अपील क्र. ८५४/नाग/२०१० अपील क्र. ८७७/नाग/२०१०, ८७८/नाग/२०१० व ८७९/नाग/२०१० मध्ये उत्तरवादी हजर आहेत.  या सर्व प्रकरणी अपीलकर्ता हे गैरहजर आहेत.

२.  अपील क्र. ८५४/नाग/२०१० हे दि. १५/०७/२०१० रोजी सुनावणीस ठेवण्यात आले होते. उत्तरवादी हजर होते त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते. अपीलकर्ता यांनी दि. २७/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महसूल कार्यालय आर्वी, जि. वर्धा यांचेकडे अनुसुचित हलबा  जमातीचे प्रमाणपत्र काढण्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे एकूण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

मुद्या क्र.१ - अनुसुचित हलबा जमातीचे प्रमाणपत्र काढतांना कोणकोणते सबळ पुरावे लागतात त्याबाबत सविस्तरपणे एकूण पुराव्यांचे क्रमांकासह माहिती पुरवावी / घ्यावी.

मुद्या क्र. २ - अनुसुचित हलबा जमातीचे प्रमाणपत्र काढतांना कायम रहिवासी म्हणून कोणत्या वर्षीचा पुरावा ग्राहय मानला जातो तो दिनांक महिना व वर्ष याबाबत माहिती कळवावी, त्याबाबत शासन आदेशाच्या झेरॉक्स प्रती पाठवाव्यात.

मुद्या क्र. ३ - हलबा जमातिचे प्रमाणपत्र काढण्याकरीता आलेला अर्ज किती दिवसात निकाली काढण्यात येतो याबाबतची माहिती पुरवावी.

मुद्या क्र. ४ - सन १०/०९/१९५० ला आर्वी महसूल विभागात शासन आदेशानुसार हलबा गोंड या जमाती अनुसुचित जमातीच्या सवलतीस पात्र होत्या अथवा नाही याबाबत शासन आदेश आवक क्रमांकासह सही शिक्क्यानिशी प्रमाणीत सत्यप्रतिलिपी सह पाठवावा.

मुद्या क्र.५ - हलबा जमात आर्वी उपविभागात शासन आदेशानुसार जमातीचे प्रमाणपत्र देण्यास अस्तित्वात आहे अथवा नाही याबाबत आपल्या कार्यालयाची माहिती द्यावी.

मुद्या क्र.६ - हलबा जमातीला वास्तव्याचा पुरावा व जातीचा पुरावा १९५० नूसार मागितला जातो याबाबतचा शासन आदेश व संविधान अधिसुचना १०-०९-१९५० ची झेरॉक्स प्रत पाठवावी.

मुद्या क्र.७ - अनु जमातीला लागू असलेले क्षेत्रबंधन सन १९७६ ला उठविण्यात आले तर त्यानुसार आलेले जी. आर २७-०७-१९७७ चा वास्तव्याचा पुरावा खरा मानता येईल किंवा नाही याबाबत. माहिती पुरवावी.

मुद्या क्र. ८ - गोंड राजगोंड अशी जोडशब्द जात ०७/०१/२००३ पर्यंत १९७६ च्या अधिसुचनेनुसार होती त्यामध्ये ०७/०१/२००३ ला गोंड राजगोंड अशी सुधारणा झाल्यावर गोंड व राजगोंडाना सवलत सुरु झाली तर १९७६ ते ०७/०१/२००३ पर्यंत गोंडाना दिलेले जमातीचे प्रमाणपत्र वैध आहे अथवा नाही याबाबतची माहिती पुरवावी.

वरील अर्जाच्या अनुषंगाने दि.२५/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहितीसाठी रु ५०/- चा डी. डी. / पोस्टल ऑर्डर पाठवावा किंवा माहिती ही स्वत: येऊन घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतली नाही. व दि.१८/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी प्रश्नस्वरुप विचारलेली माहिती, माहिती अधिकाराच्या व्याख्येत कलम २ प्रमाणे

येत नाही. तेव्हा अपीलार्थीने कार्यालयात उपलब्ध असलेले रेकॉर्डची पाहणी करावी व त्यामधून त्यांना ज्या माहितीचे कागदपत्र पाहीजे आहे ती कागदपत्रे त्यांना प्राप्त करुन देता येतील. असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती हलबा जातीच्या प्रमाण पत्रांच्या संदर्भात मागितलेली आहे. त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पोस्टाचा खर्च भरावा असे कळविलेले होते. १) त्यांनी मागितलेली माहिती ही १९५० मधील मागितलेली आहे. तसेच २) त्यांना पोस्टाचा खर्च भरावा असे कळविलेले होते. परंतू अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला नसल्यामुळे तसेच त्यांना स्वतः येवून माहिती घेवून जावे असे कळविल्यानंतर सुध्दा त्यांनी दखल घेतली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, योग्य निर्णय दिला आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्र. ८७५/नाग/२०१० मध्ये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी महाराष्ट्र विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे सुनावणीस मुदत मागितलेली आहे. अपीलकर्ता सुध्दा गैरहजर आहेत. परंतू अपीलकर्ता यांचा सर्व अपीलांचा अनुभव पाहिल्यामुळे सदरच्या अपीलात निर्णय देण्याचा निर्णय करण्यात आला आहे. अपीलकर्ता यांनी दि. २५/०१/२०१० रोजी शासकीय माहिती अधिकारी समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई यांचेकडे शासन परिपत्रक शिक्षण व समाज कल्याण विभाग यांचे विविध शासन निर्णय किंवा परिपत्रकाची माहिती एकूण ७ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि.२०/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती व शासन निर्णयाच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या दिसून येतात. परंतू माहिती प्राप्त झाल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी दि.३०/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. कदाचित त्यामुळेच प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यानंतर दि.०९/०६/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती तपासली असता अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात जे मुद्ये काढलेले आहेत ते गैर आहेत व त्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्र. ८७६/नाग/२०१० मध्ये दि. २१/०१/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे १९५० पासून अनुसुचित असलेले क्षेत्रबंधन वर्धा, नागपूर जिल्हयात दि.२७/०७/१९७७ पासून उठविलेले असल्यामुळे या जिल्ह्यातील जमाती तेव्हापासून सवलती घेण्यास पात्र झाल्या. त्यामुळे या जमातींचे प्रस्ताव काढतांना वास्तव्याच्या पुराव्याच्या संदर्भात स्वतःची मते मांडून माहिती पाठविणे संदर्भात एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २३/०२/२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी दिनांक २२/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २३/०४/२०१० रोजी देण्यात आलेला आहे व माहिती योग्य दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध करुन दिलेली माहिती तसेच प्रथम अपीलाच्या निकालाचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपील क्र. ८७७/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. ३०/१२/२००९ रोजी माहिती अधिकारी आदिवासी विकास विभाग, मुंबई यांचेकडे आदिवासी विभागात संचालक म्हणजेच आयुक्त असे आहे का. अशाप्रकारची एकूण १३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते व सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरचा अर्ज हा दि. २८/०१/२०१० रोजी शासना कडून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पूणे यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०९/०२/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २२/०२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/०३/२०१० रोजी देण्यात आलेला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे प्रथम अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सर्वसाधारण माहिती आहे. व ती प्रत्येक कार्यालयामध्ये दर्शनी भागात लावण्यात आलेली असते. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती मध्ये कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक व्यापक हित नाही. जात पडताळणी समिती यांचे संशोधन कार्यालय यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी हलबा जमातीच्या प्रमाण पत्राकरीता त्यांच्या कार्यालयात अर्ज केला त्या अर्जासोबत त्यांनी

कोणत्याही प्रकारची कागदपत्रे जोडलेली नाहीत. त्यामुळे ते अशाप्रकारच्या सर्वच कारणांना वेठीस धरुन असंबंध्द अशी माहिती मागून दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. तसेही अपीलकर्ता यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्र. ८७८/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. २४/०१/२०१० रोजी माहिती अधिकारी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती रविभवन गिरीपेठ नागपूर यांचेकडे हलबा जमातीच्या अर्जदाराने जात पडताळणीच्या संदर्भात कोणते पुरावे जोडावे याबाबत एकूण ७ मुद्यांमध्ये प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २०/०३/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती जमाती व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या संदर्भात कोणते पुरावे सादर करावे वगैरे अशी माहिती विचारलेली आहे. व कोणते पूरावे दिले म्हणजे जमाती पडताळणी समितीचे समाधान होईल अशी माहिती मागितली त्याचे कारण असे की, अपीलकर्ता यांनी हलबा जमातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे कार्यालयात अर्ज केला आहे व तो प्रलंबित आहे व त्यासोबत त्यांनी कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत त्यामुळे ते अशाप्रकारची माहिती मागत आहेत. जाती प्रमाणपत्र समितीच्या संदर्भात अधिनियमाची निश्चित प्रक्रिया किंवा कार्यपध्दती निश्चित केली आहे व त्याबाबत समितीचा निर्णय मान्य नसल्यास मा. उच्च न्यायालयामध्ये अपील दाखल करावे लागते परंतू तसे न करता, कोणतीही कागदपत्रे दाखल न करता अपीलकर्ता हे सर्व अधिकार समितीला असण्याच्या दृष्टिने अशी माहिती मागत आहेत, जी कार्यालया संदर्भात उपलब्ध नसते. त्यांचे सर्व प्रश्न

हे अकल्पित आहेत. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

७. अपील क्र. ८७९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. २७/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय महसूल कार्यालय हिंगणघाट यांचेकडे हलबा जमातीचे प्रमाण पत्र काढण्या बाबत प्रस्ताव स्विकारत नाही. याबाबत शासन आदेशाच्या झेरॉक्स प्रती, दि.१०/०९/१९७० चा अनुसुचित जमातीच्या जातीचा व वास्तव्याचा पुरावा का मागता, अशा प्रकारची एकूण ११ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि.२३/०२/२०१० रोजी जी माहिती उपलब्ध आहे त्याबद्यल माहिती उपलब्ध आहे असे कळविले आहे. व जी माहिती कार्यालयाकडे उपलब्ध नाही त्याबद्यल उपलब्ध नाही असे मुद्येनिहाय कळविले आहे. एकूण पाच पानांच्या करीता माहिती रजिस्टर टपालाने मागितलेली असल्यामुळे रजिस्टर पोस्टाचा लिफाफा पाठवावा असे कळविलेले दिसून येते. परंतू तसे न करता अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे व त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे केव्हाही माहिती घेण्यास आलेले नाही व त्यांनी रजिस्टर पोस्टाचा खर्च सुध्दा दिलेला नाही. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांचे सर्व मुद्ये हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ मधील 'माहिती' व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

८. अपीलकर्ता यांनी त्यांचा अपघात झाला आहे म्हणून त्यांना हजर राहता येत नाही असे दि.१५/०७/२०१० रोजी फॅक्सद्वारे मा. आयोगाचे कार्यालयास कळविले आहे. आज त्यांची एकूण ७ अपीले सुनावणीस आहेत व त्यांनी सकाळी त्यांची गाडी पंक्चर झाली आहे म्हणून येण्यास विलंब होईल असे मा. आयोगाचे कार्यालयास कळविले. परंतू ते १३.०० वाजता पर्यंत सुध्दा कार्यालयात हजर झाले नाही. अपीलकर्ता यांची गाडी जर पंक्चर

झाली असेल तर याचा अर्थ त्यांचेकडे वाहन आहे. वाहन असलेली व्यक्ती ही दारिद्रय रेषेखालील प्रमाण पत्राच्या निकषात येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जो पत्ता दिलेला आहे तो सुध्दा त्यांनी स्वतःचा दिलेला नाही तर C/o, दिलेला आहे त्यामुळे आर्वी पंचायत समितीचे खंडविकास अधिकारी यांनी अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहेत किंवा नाही याबद्यलची चौकशी करुन तसा अहवाल तहसिलदार आर्वी यांचेकडे पाठविणे संयुक्तिक राहील. जेणेकरुन तहसीलदार यांना शासन निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ८५४/नाग/२०१०, ८७५/नाग/२०१०, ८७६/नाग/२०१०, ८७७/नाग/२०१०, ८७८/नाग/२०१०, ८७९/नाग/२०१० ही सर्व अपीले खारीज करण्यात येतात.

२. सदरच्या निर्णयाची एक प्रत खंडविकास अधिकारी ग्राम पंचायत समिती आर्वी जि. वर्धा यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ८८२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री वसंत लक्ष्मणराव भिवापूरकर<br>९८, जंबूदिपनगर, अयोध्यानगर, नागपूर<br>ता.जि. नागपूर - २४ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (विद्युत)<br>प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक, बांधकाम विभाग, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर<br>बंगला न. ३९/१, सिव्हील लाईन नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/१२/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सा. बां. (विद्युत) विभाग नागपूर यांचेकडे निवृत्ती वेतनातील महागाई भत्त्यातील फरकाच्या रकमेबाबत, सहावे वेतन आयोग लागू झाल्यानंतरच्या फरकाच्या संदर्भात तसेच दरमहा निवृत्ती वेतन अदा केल्या जात नसल्याच्या संदर्भात शासनाचे परिपत्रक आदेश इ. बाबतची निश्चित माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २८/०१/२०१० रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २२/०१/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १५/०७/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. परंतू तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन त्यांच्या मागण्या मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या अर्जातील मागण्या या मंजूर करण्यात आल्या नाही परंतू जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता हे आधी निलंबित झालेले आहेत. त्यांचे विरुध्द अँटीकरप्शनची केस आहे व त्याबाबत उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. माहितीचे संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. लेखा परिक्षकांकडून न्यायालयीन निर्णयाशिवाय पुढील कार्यवाही करता येत नाही. किंवा त्या पत्राच्या बाबत अपीलकर्ता यांना माहित असून सुध्दा त्यांच्या मागण्या मान्य करता येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीपेक्षा त्यांच्या निवृत्ती वेतनाच्या संदर्भात कार्यवाही करुन घ्यावयाची असल्याचे दिसून येते. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे कोणत्याही प्रकरणामधील गुणवत्तेच्या संदर्भात निर्णय देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८३९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जैमेश तिलकराज थापर<br>३८, क्लार्क टाऊन, थापर मार्ग, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |
| | **विरुध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>नागपूर उड्डाण क्लब<br>विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>नागपूर उड्डाण क्लब<br>विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांच्या तर्फे ॲड. एस.एच. बरबटकर हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर उड्डाण क्लब विभागीय आयुक्त यांचे कार्यालयात नागपूर उड्डाण क्लबला सन १९९३ मध्ये २ सेसना १५२ एअरक्राफ्ट करीता रु. ३,३१,९४४/- ची रक्कम दिली होती. त्या संदर्भात काय वस्तुस्थिती आहे ती माहिती द्यावी. तसेच सदरची रक्कम व्याजासहीत परत करण्याची काय कार्यपध्दती आहे याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी १९९२ ते २००९ आहे. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०३/१२/२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता रु २/- चा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. त्या नंतर दि. १८/०१/२०१० रोजी दुसरे सह दिवाणी न्यायाधिश वरीष्ठ स्तर यांनी पारीत केलेल्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांना पुरविण्यात आलेली दिसून येते. परंतू समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. १८/०२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. १७/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना रु. ३,३१,९४४/- ही रक्कम शार्ट टर्म डिपॉझिट म्हणून उड्डाण क्लबच्या नावानी बँकेत जमा करण्यात आली होती. तत्कालीन व्यवहारातील त्रुटींमुळे सदरची रक्कम कोर्टाचे निकाल लागल्या नंतर उड्डाण क्लबच्या कार्यालयीन खर्चाकरीता समायोजित करण्यात आली. तसेच कोर्ट प्रकरण क्रमांक R.C.S. No. २०२८/९६ मध्ये दि. ०१/११/२००० रोजी अंतीम निर्णय झाल्यामुळे रक्कम परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. एस. एच. बरबटकर हे हजर झाले होते. त्यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी सदरची रक्कम परत करण्याची कार्यपध्दती विचारली होती. त्या दिवाणी दाव्याच्या निर्णयामुळे रक्कम परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही अशी त्यांनी चुकीची माहिती दिली होती. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे काम हे करारनामा प्रमाणे झाले व करारनामा मध्ये रक्कम परत करण्याच्या संदर्भाची अट आहे. असे असले तरी रक्कम परत करण्याच्या अटीच्या संदर्भातील जर नियम असतील किंवा अटी असतील त्या नियमाच्या छायांकित प्रती किंवा टेंडर मधील संबंधीत अटीच्या संदर्भातील छांयाकीत प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. ११/११/२००९ च्या अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भामध्ये रक्कम परत करण्याच्या संदर्भात ज्या अटी किंवा शर्ती असतील त्याच्या छायांकित प्रती विनामुल्य पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ७०६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. पुनम नंदकिशोर गौतम<br>श्रीराम नगर, मानेवाडा रिंग रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ३४ | - | **अपीलकर्ती** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे -१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे -१ | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ८३८/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | श्री आनंद अजाबराव धानोरकर<br>तुकाराम सभागृह चौक, घाडीवाल ले-आऊट, बौध्द विहाराजवळ<br>रिंग रोड  नागपूर - २७ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे -१ | - | **उत्तरवादी** |
| ६. | जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे -१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १४/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपील क्र. ७०६/२०१० मध्ये अपीलकर्ती यांनी दि. २६/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती गैरहजर आहे. जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांनी दि.२८/०६/२०१० च्या फॅक्स संदेशानुसार सदर प्रकरणाची सुनावणी दि. १४/०७/२०१० रोजी ठेवण्याची विनंती केली. आयोगाने त्यांची विनंती मान्य केल्यानुसार अपीलकर्ती व उत्तरवादी यांना पुढील सुनावणीचे पत्र पाठविण्यात आले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे हे गैरहजर असून त्यांचे पत्र दि.०८/०७/२०१० नुसार निवेदन प्राप्त झाले आहे. दि. १४/०७/२०१० रोजी अपीलकर्ती हजर आहे. जनमाहिती अधिकारी तथा उपायुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे हजर आहेत.

२. अपील क्र. ७०६/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ती यांनी दि. २२/१२/२००९ रोजी आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पूणे, यांना डी. टी. एड. प्रथम वर्ष परिक्षा सप्टेंबर २००९ मधील विषय संकेतांक क्रमांक ८१ भारतीय समाज, ८२ मानसशास्त्र, ८३ मुल्यमापन, ८४ व्यवस्थापन, ८५ गणीत या विषयांच्या उत्तरपत्रिकेच्या सत्यप्रती बाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ती यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०१/०२/२०१० रोजी डी. टी. एड. परिक्षेत तपासण्यात आलेल्या उत्तर पत्रिकांचे पुर्नमुल्यांकन करण्याची नियमात तरतुद नाही. गुण पडताळणीसाठी विहीत मुदतीत विहीत रक्कम भरुन अर्ज केला असल्यास गुण पडताळणीचा निर्णय संबंधित विभागाकडून कळविण्यात येईल. केंद्रीय माहिती आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपील क्रमांक ICPB/A-२/CIC/२००६, दिनांक ०६/ फेब्रुवारी २००६ च्या संदर्भात दिलेल्या निर्णयानुसार तपासलेल्या उत्तरपत्रिका ह्या गोपनीय स्वरुपात मोडतात. तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या सक्षम समितीनेही तपासलेल्या उत्तरपत्रिका ह्या गोपनीय स्वरुपाच्या

असल्याने त्याच्या सत्यप्रती /झेरॉक्स प्रती कोणी मागणी केल्यास त्या देण्यात येऊ नये असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपली वरील अर्जाद्वारे केलेली विनंती मान्य करता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (E) व (J) नुसार संदर्भीय अर्जातील विनंती नाकारण्यात येऊन आपला सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी ११/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २०/०४/२०१० रोजी देण्यात आला आहे. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे असे दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना सर्व विषयांमध्ये कमितकमी मार्कस कसे मिळाले याबाबत माहिती जाणून घेण्याकरीता म्हणून त्यांनी उत्तरपत्रिकांची मागणी केली आहे.

३. अपील क्र. ७०६/२०१० मध्ये परिक्षेचा निकाल झाल्यानंतर लगेच ५ दिवसात उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांनी मागितलेल्या आहेत त्यामुळे सदरच्या उत्तरपत्रिकांचे जतन करणे आवश्यक होते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या वेळेस जर अपीलकर्ता उपस्थित झाले असते तरी त्यांना गोपनीयतेच्या कारणास्तव उत्तरपत्रिका दाखविण्यात आली नसती. असे असले तरी गोपनियतेचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे सदरच्या प्रकरणात उत्तरपत्रिका जर उपलब्ध असेल तर अपीलकर्ता यांना तसे लेखी कळवावे. पूणे येथील महाराष्ट्र परिक्षा परिषदेच्या कार्यालयामध्ये उपस्थित होवून उत्तरपत्रिका ही त्यांना दाखविणे संयुक्तिक राहील व उपलब्ध नसल्यास तसे त्यांना लेखी कळविणे संयुक्तिक राहील.

४. अपील क्र. ८३८/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. ०८/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पूणे, हेच हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दि.११/०४/२०१० रोजी आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेकडे मे २००७ च्या परिक्षेची गुणपत्रिका प्रमाणित प्रत देण्यात यावी (आसन क्र. ५७१९२०१७) अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दि. ११/०४/२०१० व २८/०४/२०१० च्या अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. २९/०५/२०१० च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

मे २००७ च्या परिक्षेची गुणपत्रिका (आसन क्र. ५७१९२०१७) सदर निकाल RES. CT. असल्यामुळे दिली नाही. मे २००७ च्या परिक्षेचा निकाल, प्राचार्य नागपूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे मार्फत अध्यापक विद्यालय कोराडी, ता. कामठी जिल्हा-नागपूर यांचेकडे दिला आहे, दि. २२/१०/२००७ चे मूळ गुणपत्रक दिले नाही. दि. ०२/०८/२००८ चे मूळ गुणपत्रक अध्यापक विद्यालयाकडून आपणास देण्यात आलेले आहे. सदर दोनही गुणपत्रकाच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडलेल्या आहेत. दोनदा गुणपत्रके दिली परंतू निकाल दोनदा जाहीर केलेला नाही. तफावतीची कागदपत्रे उपलब्ध नाही. सर्वोच्च न्यायालयात जाण्याकरिता महाराष्ट्र शासनाकडे सादर केलेल्या अर्जाची अथवा महाराष्ट्र शासनाने दिलेल्या परवानगीची प्रमाणित प्रत उपलब्ध नाही. तथापी सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या शपथपत्राची प्रमाणित प्रत दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत सर्वोच्च न्यायालयाकडूनच मिळेल. सन २००५-०६ चे प्रवेश देणे बाबतची कार्यवाही संचालक महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांच्या मार्फत झालेली आहे. शासन निर्णयाची प्रत त्यांच्याकडून आपणास प्राप्त होऊ शकेल. गुणपत्रिका देण्याच्या संबंधी अडचण असल्यास विद्यार्थ्यांना निकाल कळावा म्हणून गुणांचे स्टेटमेंट दिले जाते. आपणास अर्जातील सर्व मुद्यांची माहिती दिलेली आहे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती (साक्षांकित) या पत्रासोबत दिलेल्या आहेत, असे नमूद केले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ११/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे अपीलाबाबत एकतर्फी निर्णय घेवून शासकीय माहिती अधिकारी तथा उप आयुक्त यांनी दिलेल्या माहितीशी अपीलीय अधिकारी सहमत आहेत असे अपीलार्थीला दि. ०८/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविल्याचे दिसते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती मिळाली आहे ती चुकीची, दिशाभूल करणारी व अपूर्ण आहे परंतू त्यांनी याबाबत विशेष खुलासा केलेला नाही मात्र त्यांनी गुणपत्र मिळाले नाही अशी दोन, तीन कारणे सांगितली. दोनही अपीलांच्या संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गुणपत्रके दोन महिन्याच्या कालावधीकरीता जतन केले जातात. कारण गुणपत्रिकेच्या संदर्भामध्ये तरतुद आहे पण ती पुरविण्याकरीता कोणतीही तरतुद नाही. तसेच गुणपत्रक ३ महिन्याच्या कालावधीत पूर्ण केले जाते, या संदर्भात गुणपडताळणी झाली आहे तरीसुध्दा उत्तर पत्रिकांची मागणी करण्यात आलेली आहे. उत्तर पत्रिकांच्या संदर्भामध्ये त्यांनी दाखल केलेल्या खुलाशामध्ये केंद्रीय माहिती आयोगाचा निर्णय दिलेला आहे. तसेच राज्य माहिती आयुक्त यांचा निर्णय सुध्दा त्यांनी निदर्शनास आणलेला आहे. त्यामध्ये उत्तरपत्रिका उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय आयोगाचे निदर्शनास आणला असला तरी उत्तर पत्रिका विद्यार्थ्यांस त्यांच्या गुण मिळालेल्या संदर्भात शंका असल्यास त्यांना उत्तर उत्तरपत्रिकांची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मोठ्या प्रमाणावर जरी विद्यार्थी प्रवेश घेत असतील तरी सर्वच विद्यार्थी हे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रति मागतात असे नाही. विद्यापिठामधे सुध्दा मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी परिक्षेस प्रविष्ठ होत असतात. परंतू विद्यापिठातच विशेष शुल्क भरुन विद्यापिठाकडून उत्तरपत्रिका घेण्याची तरतुद आहे. याचा अर्थ त्यात कोणत्याही प्रकारचे परिक्षाशुल्क भरण्यास विद्यापीठ किंवा परिक्षा परिषद यांच्या मध्ये विश्वासार्हतेचे नाते आहे व ते भंग पावते असे म्हणता येत नाही. तेच तत्व परिक्षा परिषदेच्या संदर्भामध्ये किंवा परिक्षा परिषदेने शिष्यवृत्तीच्या संदर्भात लावण्यास हरकत नाही. ज्या विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती मागितलेल्या आहेत त्यांच्या उत्तरपत्रिका आयोगाचा निर्णय मिळेपर्यंत जतन करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी २००७ मध्ये झालेल्या परिक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती २०१० मध्ये मागितलेल्या आहेत. त्या अर्जाप्रमाणे उत्तरपत्रिका ही उपलब्ध करुन देता येणार नाही. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही अपूर्ण, दिशाभूल करणारी व चुकीची आहे याबाबतचा खुलासा समाधानकारक नाही. मात्र जर गुणपत्रिका मिळाली नाही तर ती पुन्हा पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता वरील दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आदेश

१. अपील क्र. ७०६/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या उत्तरपत्रिका ह्या उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना निरिक्षणाकरीता दाखविण्यात याव्या. तसे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना लेखी कळवावे त्याकरीता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होवून उत्तरपत्रिकांचे निरिक्षण करावे.

२. अपील क्र. ८३८/नाग/२०१० हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या परिक्षेच्या संदर्भात गुणपत्रिका उपलब्ध असल्यास तसे अपीलकर्ता यांना लेखी कळवावे. व लेखी कळविल्यानंतर अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरच्या गुण पत्रिकेच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ८६७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पुरुषोत्तम शंकरराव महाडिक<br>६/१/०२, विज केंद्र वसाहत, कोराडी<br>ता. कामठी जि. नागपूर- ४४१ १११ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक<br>कोराडी औष्णीक विद्युत केंद्र, कोराडी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक अभियंता (समन्वय)<br>कोराडी औष्णीक विद्युत केंद्र, कोराडी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०७/०६/२०१० रोजी नोट ीस काढून दिनांक १६/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांच्या तर्फे जनमाहिती अधिकारी हेच उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, मुख्य महाव्यवस्थापक (सं. व.सु) औष्णीक विद्युत केंद्र, कोराडी नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

१. Circular No. २६३ व २६४ Dt. ०६/०१/१९८७ (कोराडी कार्यालयाचे) व Notification for the Post of Art Gr. 'D' (Bull-dozar) यांच्या प्रती.

२. Office Order No. KTPS/Estt/I.A. १२/७५२७ dt. १३/०७/१९८७ नुसार १२ S.S.L. ला Art Gr. 'D' ( Bull Dozar) या पदावर नियुक्त करण्यात आले होते. तेव्हा ही पदे (Art Gr. 'D' ( Bull Dozar) Recruitment Regulation च्या कोणत्या तरतुदी (Shedule) मध्ये आहेत त्याचा क्रमांक देण्यात यावा.

३. उपरोक्त कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता कुठे व कशी होती व त्यांचे Promotion Channel Recruitment Regulation मध्ये आहे किंवा होते काय? कळवावे.

४. उपरोक्त पदे भरतांना मुख्यालयाची मंजूरी होती काय ? व असल्यास मंजूरीचे पत्राची प्रत देण्यात यावी.

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २३/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २९/०४/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना सुनावणी दरम्यान ठरल्यानुसार वर्गीकरण व सेवा प्रवेश विनियम १९६१ मधील कारागीर 'ड' पदाची पुर्वावश्यकता असलेल्या पानाच्या साक्षांकित प्रती १० दिवसाचे आत देण्याचे ठरल्यानुसार या पत्रासोबत २ पाने साक्षांकित करुन या पत्रासोबत जोडून देण्यात येत आहेत असा निर्णय झाला असे दिसते. परंतू समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांचेही प्रकरण न्यायालयात दाखल आहे व त्या संदर्भात सेवाजेष्ठतेच्या संदर्भामध्ये भरती प्रक्रियेच्या संदर्भातील स्थानिक जी परीपत्रके काढण्यात आलेली आहेत त्या १९८७ या वर्षातील परीपत्रकाच्या छांयाकित प्रती त्यांना आवश्यक आहेत. परंतू त्या परिपत्रकाच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी दि. १२/०३/२०१० रोजी मागितलेली माहिती भरती कक्ष विभागाशी संबंधीत आहे. संबंधीत विभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर सदरची माहिती आपणास तातडीने पुरविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील

दाखल केल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपण सन १९८७ या वर्षाची जी माहिती मागितली आहे ती या कार्यालयात उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविले व प्रथम अपीलाच्या सुनावणीत ठरल्याप्रमाणे त्यांना दोन सहपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत. परंतू अपीलकर्ता यांनी पुन्हा आयोगापुढे असे सांगितले की, १९८७ चे भरतीचे परिपत्रक उपलब्ध नाही तरीसुध्दा त्यांच्या न्यायालयीन भरतीच्या संबंधात जी काही माहिती उपलब्ध होवू शकेल ती त्यांच्याकडे देण्यात येवून व चर्चा करुन प्रत्यक्ष शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून दहा दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांच्याशी व्यक्तीशः संपर्क साधून व सहकार्य करुन व त्यांच्या न्यायालयीन कामकाजाकरीता उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमधील उपयोगी कागदपत्रांचे प्रत्यक्ष निरिक्षण करुन उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झाल्यावर त्यांना सहकार्य करुन त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेवून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा शोध घेवून उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८५२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दामोधर मोतीराम जिभकाटे<br>मु. पो. विरली (खं.)<br>ता. पवनी जि. भंडारा - ४४१९०३ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जनरल मॅनेजर<br>वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक, मुरारी पेठ - ६, सोलापूर<br>ता. जि. सोलापूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय प्रबंधक<br>वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ८५३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | श्री विनोद रामभाऊ मोटघरे<br>मु. पो. विरली (खंदार.)<br>ता. पवनी जि. भंडारा - ४४१९०३ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जनरल मॅनेजर<br>वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक, मुरारी पेठ - ६, सोलापूर<br>ता. जि. सोलापूर | - | **उत्तरवादी** |
| ६. | जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय प्रबंधक<br>वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपील क्र. ८५२/नाग/२०१० व अपील क्र. ८५३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. ०२/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०६/२०१० रोजी नोटीस

काढून दिनांक १५/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपील क्र. ८५२/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व त्यांचे पत्र दि. २६/०६/२०१० रोजी माहिती अधिकारी / क्षेत्रीय प्रबंधक, प्राप्त झाले असून अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे चिरंजीव देवेन्द्र दामोधर जिभकाटे हे हजर आहेत. अपील क्र. ८५३/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. या दोनही अपीलांमध्ये जनमाहिती अधिकारी तथा क्षेत्रीय प्रबंधक वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक, भंडारा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.

२. अपील क्र. ८५२/नाग/२०१० व ८५३/नाग/२०१० ही दोनही अपीले दि. १६/०१/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक वैनगंगा क्षेत्रीय ग्रामीण बँक अड्याळ जि. भंडारा यांचेकडे पिक विमा (सन २००८-२००९) योजनेच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. परंतू विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून दि. १५/०३/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३ अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात दि. ०१/०२/२०१० रोजी क्षेत्रीय प्रबंधक तथा प्राधिकृत अधिकारी यांनी अड्याळ शाखेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करु शकता Secrecy code अंतर्गत दुसऱ्या व्यक्तीची माहिती आम्ही देऊ शकत नाही व तसे आम्ही अड्याळ शाखेला कळविले आहे. माहिती मिळविण्याकरीता आपणास प्रत्येक पानास रु. १०/- (रुपये दहा) संबंधीत शाखेत भरावे लागतील असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

जनमाहिती अधिकारी श्रीयुत पी. डी. कशाळकर यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, ग्रामीण बँक ही केंद्र शासनाचा उपक्रम आहे व त्यामुळे सदरची दोनही अपीले ही केंद्रीय माहिती आयोगाकडे दाखल करणे आवश्यक होते. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींप्रमाणे अपीलकर्ता यांना प्रथम

अपीलाच्या निर्णयाविरुध्द कोणत्या प्राधिकरणाकडे अपील करावे लागेल असे कळविले असते तर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले नसते. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी हेच जबाबदार आहेत असे दिसून येते. असे असल्यास सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ८५२/नाग/२०१० व ८५३/नाग/२०१० ही अपीले अपीलकर्ता यांना केंद्रीय माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर करणे आवश्यक असल्यामुळे सदरचे दोनही अपील खारीज करण्यात येतात.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ८४७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुर्यभान गुलाबराव मेश्राम<br>मु. हिंगणा पो. खुबाळा<br>ता. सावनेर जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती सावनेर<br>ता. सावनेर जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा) जि. प. नागपूर यांचे दि. २९/०६/२०१० च्या पत्राची प्रत दि.०३/०७/२०१० ला मा. आयोगाकडे प्राप्त झाली आहे. परंतू दि.१५/०७/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी नागपूर यांनी सदर अर्ज खंडविकास अधिकारी यांचेकडे हस्तांतरीत केला त्यामुळे सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून खंडविकास अधिकारी यांच्या तर्फे कक्ष अधिकारी (माहिती अधिकारी पंचायत संमिती कार्यालय) यांनी खुलासा केला आहे.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा खंडविकास अधिकारी पंचायत समिती यांचे कार्यालय मौजा खुबाळा तहसील सावनेर जि. नागपूर येथे सन २००३-२००५ पर्यंतच्या वर्षात विशेष

घटक योजना (विहीर) जवाहर योजना विहीर अनुदाना करीता (१) गुणेश्वर माणिकराव गजभिये (२) सौ. मधूप गुणेश्वर गजभिये या लाभार्थ्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. १२/०३/२०१० रोजी सौ मधुप गुणेश्वर गजभिये यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांची माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली. श्री गुणेश्वर माणिकराव गजभिये यांच्या संदर्भात उपअभियंता जिल्हा परिषद उपविभाग कळमेश्वर यांना दि. ३१/०३/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यास सांगितले, व तसे श्री सुर्यभान मेश्राम हिंगणा पो. खुबाळा ता. सावनेर यांना अवगत सुध्दा केले आहे. तसेच श्री गुणेश्वर माणिकराव गजभिये यांनी जोडलेल्या दस्तऐवज लाभार्थी प्रकरणाच्या उचीत कार्यवाही बाबत दि. ०८/०४/२०१० रोजी कळविण्यात आले व अद्यापपर्यंत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील करुन दि.२२/०४/२०१० रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांना कळविले. सदरच्या प्रकरणात कोणत्याही प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०३/२०१० रोजी व त्यापूर्वीही दि. १४/१२/२००९ रोजी माहितीचा अर्ज दाखल केला होता. या सर्व अर्जाच्या संदर्भात त्यांनी एकच प्रथम अपील दाखल केले व एकच द्वितीय अपील दाखल केले. माहितीचा अधिकार २००५ च्या तरतुदींप्रमाणे कलम ६ (१) प्रमाणे माहितीचा अर्ज दाखल केल्यानंतर त्यास ३० दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व त्यानंतर ३० दिवसाचे आत प्रथम अपील दाखल करण्याची तरतुद आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर ९० दिवसात द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक असते त्यामुळे ३ वेगवेगळया तारखांना दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात प्रत्येक अर्जाच्या तारखेनुसार वेगवेगळी मुदत येत असल्याने अनेक अर्जाच्या संदर्भात एकचएक प्रथम अपील किंवा द्वितीय अपील करणे हे अवैध आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांच्या दि.०३/०३/२०१० च्या अर्जाचा त्यासंबंधी विचार करण्यात आला आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना सौ. मधुप गुणेश्वर गजभिये यांच्या संदर्भात माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू श्री गुणेश्वर गजभिये व मधुप गजभिये यांचे संदर्भातील माहिती पंचायत समिती सावनेर यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे व ती माहिती उपअभियंता

जिल्हा परिषद सिंचन उपविभाग कळमेश्वर यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे दि.३१/०३/२०१० रोजी त्या कार्यालयाला कळविण्यात आले. पुन्हा ०८/०४/२०१० रोजी त्यांना स्मरणपत्र देवून माहिती मागितली त्यावर त्यांनी पंचायत समिती यांच्या स्तरावर कार्यवाही होत असल्याने संबंध येत नाही असे वगैरे कळविले. त्यानंतरही त्या संदर्भातील माहिती अद्यापपर्यंत त्यांना उपलब्ध झाली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, खंडविकास अधिकारी यांचे कार्यालयात माहिती अधिकारी हे कक्ष अधिकारी आहेत आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे खंड विकास अधिकारी आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दाखल केले असल्यामुळे या कार्यालयाकडे प्राप्त झाले नव्हते. असे असल्यामुळे अपीलकर्ता यांना श्री गुणेश्वर माणिकराव गजभिये यांच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याबाबतही जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधीत कार्यायलयामध्ये गुणेश्वर माणिकराव गजभिये यांचे संदर्भात प्रस्ताव नसून तो माणिकराव गजभिये यांचे संदर्भात आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी दि.१/०४/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. परंतू असे असले तरी अपीलकर्ता यांना माणिकराव गजभिये यांचे संदर्भात सादर केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना श्री मानिकराव गजभिये यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पुरविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ८४८/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रोहीत दिनेश बोंबार्डे<br>आंबेडकर नगर, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा. | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता<br>नगर परिषद तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. २४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०१० रोजी मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांचे कार्यालयात १) वार्ड नं. १० च्या आंबेडकर नगरातील श्री भजनजी मेश्राम यांचे घरापासून श्री दिनेशजी बोंबार्डे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम कोणत्या योजने अंतर्गत झाले आहे त्याची इस्‍ ट मेट कॉपी देण्यात यावी. २) रस्त्याचे बांधकामाची निधी. ३) तसेच सामोरील श्री अशोकजी कापसे यांच्या घरापासून श्री अरविंदजी पाटील यांच्या घरापर्यंत नाल्याची योजना आहे किंवा नाही, असेल तर त्याची इस्‍टमेट कॉपी देण्यात यावी. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अर्जदाराने दि.२०/०४/२०१०

रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १०/०५/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती अधिकारी श्री देशमुख कनिष्ठ अभियंता यांनी अपीलार्थी श्री बोंबार्डे यांचेसोबत जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन अपीलार्थी यांना माहिती अर्जाप्रमाणे आवश्यक ती माहिती पुढील १० दिवसांचे आत विनामुल्य पुरविण्यात यावी असे नमूद केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. उपलब्ध केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती ही तपशीलात उपलब्ध करुन दिली आहे. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सदरच्या प्रकरणामध्ये त्यांचेवर अन्याय झालेला आहे असे आयोगापुढे सांगितले. परंतू माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीं प्रमाणे माहिती जशी आहे तशीच उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेच्या बाबत आयोगास निर्णय करता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. परंतू ती माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरच उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना विलंबाचे कारण विचारले त्यावर त्यांनी असे सांगितले की, माहितीचा शोध घेण्यासाठी व मौका चौकशी करण्यास विलंब लागला. ती मौका चौकशी ही प्रथम अपीलाच्या आदेशा नंतरच करण्यात आली अपीलकर्ता यांच्या दि.१८/०३/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे दि.१८/०३/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत म्हणजे अधिनियमाचे कलम ७ (१) प्रमाणे ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांच्या दरमहाचे वेतनातून करण्यात येवून ती

लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी. सदरच्या शास्तीची वसूली ही मुख्याधिकारी नगर परिषद यांनी करावयाची आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८४९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संजय गोलावार<br>राम नगर, वर्धा<br>ता.जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता/प्रशासक<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर<br>वैनगंगा नगर, अजनी, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>लघु पाटबंधारे विभाग, नागपूर<br>वैनगंगा नगर, अजनी, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांचे तर्फे कार्यकारी अभियंता श्री अ.स. देव हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/०५/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, नागपूर वैनगंगा नगर, अजनी नागपूर यांचे कार्यालयात असंपादित जागेकरीता खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

> १. असंपादित जागेत गौळ लघु कालव्याचे काम करण्यात आले होते नंतर ते काम संपादित जागेत केले. त्यामुळे शासनास अतिरिक्त खर्च करावा लागला. हा खर्च कोणाकडून वसूल केला? रक्कम किती.

२. सा. क्र. ० ते ६०० मी. चे सीमागोटे केव्हा गाडणार ? पुढील काम केले काय ?

३. सा. क्र. २१० वर पूल बांधला त्याचा उद्येश काय? तसेच सा.क्र. ० ते २१० मध्ये शासकीय जागेत सर्व्हीस रोड केव्हा करणार ?

४. मूळ संरेखेप्रमाणे मायनरचे काम न करण्याचे कारण काय ?

५. सुधारीत संरेखेस कोणाची मंजुरी आहे ?

६. सुधारीत मायनरचे जागेकरीता संबंधीत शेतकऱ्यांना विचारणा केली काय? (आजुबाजुच्या शेतकऱ्यांना).

७. माझे शेतातील जे शासनाचे अतिक्रमण (बांधकाम) केव्हा काढणार ? त्यामुळे मला शेती वहीवाटीस अडचण होत आहे.

सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १७/०६/२००९ रोजी एकूण ७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.२६/०६/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी पुन्हा दि.३१/१२/२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१५/०३/२०१० रोजी दिलेला दिसतो. व त्यामधील मुद्या क्र. ५ मध्ये मूळ संरेखाचा नकाशा संबंधीत विभागाकडून प्राप्त करुन पुन्हा त्यांना पुरवावा असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. २९/०६/२०१० च्या पत्रान्वये मूळ संरेखा नकाशाची प्रत पुरविलेली दिसते. तसेच दि.२३/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांच्या तक्रारीचे निराकरण सुध्दा केलेले दिसते. परंतू तरीही अपीलकर्ता यांनी दि. ११/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना सर्व माहिती मिळालेली आहे. तसेच त्यांच्या तक्रारींचे निराकरण सुध्दा झाले आहे. परंतू मुद्या क्र. ६ च्या संदर्भात आदेशाची प्रत प्राप्त झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे काम बांधकाम विभागाने केले आहे. त्यामुळे सदरच्या आदेशाची प्रत ही बांधकाम विभागाकडेच उपलब्ध होवू शकते परंतू त्यांच्याकडेही उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तसे

असल्यास बांधकाम विभागाकडून सदरच्या आदेशाची प्रत उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दि.२१/०५/२००९ च्या अर्जातील मुद्दा क्र. ६ च्या संदर्भातील आदेशाची प्रत उपलब्ध असल्यास ती मिळवून पुरवावी व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिति आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. ८६१/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती श्रावणजी सनेसर<br>द्वारा - शिंदे टायर वर्क्स, पोस्ट ऑफीस जवळ, मेन रोड, आर्वी<br>ता.आर्वी जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहा आयुक्त<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सहा आयुक्त कार्यालय नागपूर, विभाग नागपूर<br>ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळ, सिव्हील लाईन्स नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन<br>प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त कार्यालय,नागपूर विभाग नागपूर<br>ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळ, सिव्हील लाईन्स नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सहाय्यक आयुक्त प्रादेशिक पशुसंवर्धन यांचे कार्यालयामध्ये मा. जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा (पूनर्वसन) यांचे कार्यालयाकडून आपल्या कार्यालयाला प्राप्त वर्ग ३ व वर्ग ४ च्या उमेदवारांची नावासहीत यादी व सदर पदावर आज ९ महिन्यांचा कालावधी होवूनही मला नियुक्ती पत्र का दिले नाही याची सविस्तर माहिती कारणासहित मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३.  सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे असे नमूद केल्याचे दिसते. तसेच दि.२३/०३/२०१० अन्वये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये बसत नाही असे कळविलेले दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि.०९/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि.२९/०५/२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे समाधान न  झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सरळ सेवा भरती करीता पाठविण्यात आलेल्या पत्रामधील यादी मध्ये त्यांचे नाव होते. परंतू ९ महिन्याचा कालावधी लोट ल्यानंतर सुध्दा नियुक्ती का मिळाली नाही अशी विचारणा केली आहे. त्यावर  प्रश्नार्थक माहिती विचारलेली असल्याने ती देता येत नाही असे त्यांनी  उ त्तर दिले. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे तसेच सांगितले आहे. जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारलेल्या प्रश्नाचे कोणतेही आकलन न करुन घेता 'का' व प्रश्नार्थक चिन्ह वापरलेले आहे म्हणून प्रश्नार्थक माहिती विचारली असे कारण देवून माहिती देण्याचे नाकारले. जर एखाद्याच्या नावाच्या नियुक्तीची शिफारस करण्यात आली आहे व त्यानंतरही जर नियुक्ती होत नसेल तर त्याकरीता निश्चित असे कारण असले पाहिजे. व ते कारण शासनाच्या कामकाजाच्या पध्दतीप्रमाणे तोंडी असू शकत नाही. तर त्याबाबत लेखी  ि ट पणी करणे आवश्यक असते, त्यावरच निर्णय घेतला जातो. तर त्या ि टपणीची प्रत  उ पलब्ध  करुन देणे हे त्या प्रश्नातून ध्वनीत होते. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे सदरच्या सरळ सेवा भरती प्रक्रियेच्या अनियमिततेच्या कारणास्तव स्थगिती आली आहे, त्यामुळे नियुक्ती देता आली नाही. कार्यालयाला याबाबतचे साधे, सरळ, सोपे कारण कळविणे अवघड नव्हते परंतू बुध्दी वापरायचीच नाही असे अलिखित नियम शासकीय कार्यालयात दिसून येतात. हे  उत्तर कळविण्याची सुध्दा तसदी त्यांनी  घेतली नाही. त्यामुळे माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन हे दोषी आढळून येतात. दिलेल्या  उ त्तराचे अवलोकन केले असता माहिती मागणाऱ्यांच्या विचारणेमुळे लोकशाही समृध्द होण्यास व शासकीय कामामध्ये पारदर्शकता वाढविण्यास निश्चित हातभार लागणार आहे. तसेच आम्हाला शासनाकडून झालेले एखादे चांगले काम आपल्या पर्यंत पोहचविण्याची एक संधी प्राप्त होणार आहे त्याकरीता धन्यवाद देवू इच्छितो. अशा प्रकारचा प्रगल्भ विचार अर्जदारास  कळवायचा  मात्र त्यांना माहिती द्यावयाची नाही हे सुध्दा अनाकलनीय आहे.

प्रश्नार्थक माहिती विचारली असे कळविले परंतू नियुक्ती का झाली नाही ही शंका अनाकलनीयच राहीली. व त्यामुळे त्यांना माहिती काय मिळाली याबाबतचा विचार हा सहाय्यक आयुक्तांसारख्या अधिकाऱ्यांनी विचारणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनाही माहिती आहे व ते विलंबनाने दोषी आढळून येतात. त्यामुळे त्यांचेविरुध्द कमीतकमी याबाबतीतील अर्जदाराला या संदर्भात विहीत मुदतीत माहिती उ पलब्ध करुन दिली नसल्याने रु ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. शास्तीच्या बद्यल त्यांचे म्हणणे ऐकून घेतले परंतू त्यांनी समाधानकारक असे उ त्तर दिले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या दि. ०९/०२/२०१० च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भात योग्य ती माहिती उपलब्ध असल्यामुळे कागदपत्रांच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस् टर पोस् ट ाने उ पलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांनी विहीत मुदतीत माहिती उ पलब्ध करुन दिली नाही या कारणास्तव त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रु. ५००/- ची शास्ती लादण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८६२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विश्वनाथ गंगाराम खांडेकर<br>प्लॉट क्र. ११-बी, जोशीवाडी, कुकडे ले आऊट, मैनाबाई हायस्कुल समोर,<br>रेल्वे पो. हेड. क्वार्टर जवळ, नागपूर - ४४००२७ | - | **अपीलकर्ता** |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतुक)<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,<br>महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ३२ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक (प्रशासन) /उपमहाव्यवस्थापक (चालन)<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,<br>महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ३२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून त्यांनी प्राधिकार पत्र दिले आहे व त्यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी हेच सुनावणीस उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक (प्रशासन) / उपमहाव्यवस्थापक (चालन) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे अतिकालीक भत्त्याच्या संदर्भामध्ये तो का देण्यात आला नाही तसेच जर नागपूर विभागात याबाबत करारामध्ये विशेष बदल झाला असेल तर त्या सुधारीत कराराची साक्षांकित प्रत देणे बाबत माहिती साधारण पोस्टाने देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३.	सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२९/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलात मागितलेली माहिती नागपूर विभागाशी संबंधीत असल्यामुळे तो अर्ज विभाग नियंत्रक राज्य परिवहन नागपूर विभाग यांचेकडे पाठविण्यात आला व तसेच अपीलकर्ता यांना दि. २५/०५/२०१० रोजी कळविण्यात आले. सदरच्या अपीलाचा निर्णय दि. ३१/०५/२०१० च्या पत्रा नुसार देण्यात आला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती अधिकारी यांनी सदरचा अतिकालीन भत्ता कोणत्या पध्दतीने दिला याबाबतचा खुलासा त्यांचे दि. २०/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना दिलेल्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात दिलेला आहे, या कारणास्तव सदरचे अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, नागपूर येथील कार्यालयातून अतिकालीक भत्ता का देण्यात आला नाही त्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांना माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना या प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत युक्तिवाद केला. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.२३/०२/२०१० चा अर्ज हा मुंबई कार्यालयास प्राप्त झाला आहे. व अपील झाल्यानंतर हे सर्व प्रकरण विभागीय कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे हस्तांतरीत केले होते. त्यावरील विभागीय कार्यालयातील जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अशाप्रकारे अर्ज तीन स्तरावर केलेला आहे व त्यांना प्रत्येक स्तरावर अशी माहिती देण्यात आलेली आहे. त्यांच्या विभागीय कार्यालयातील माहितीचा अर्ज दि. २५/०२/२०१० च्या संदर्भामध्ये त्यांना दि. २०/०३/२०१० रोजी तपशीलात माहिती देण्यात आलेली आहे. ती माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा गुणवत्तेच्या आधारेच निर्णय दिल्याप्रमाणे माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा अपीलकर्ता यांना तीच माहिती उपलब्ध करुन देणे हे योग्य नव्हते म्हणून प्रथम अपील हे खारीज करण्यात आले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे दि.२३/०२/२०१० च्या अर्जात (जो मुंबई कार्यालयास प्राप्त नाही) जर नागपूर विभागात याबाबत करारामध्ये विशेष बदल झाला असेल तर त्या सुधारीत कराराच्या साक्षांकित प्रती देणेबाबत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून नागपूर विभागाकरीता अतिकालीक भत्त्याच्या संदर्भात विशेष बदल झाला असेल तर त्या स्तरावर कराराची साक्षांकित प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ८६४/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेश शालिकराम दुरुगकर<br>श्रीनगर बब्बा भवनच्या जवळ, चंद्रशेखर वार्ड, गोंदिया<br>ता.जि. गोंदिया - ४४१६०१ | - | **अपीलकर्ता** |
| | **विरुध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०७/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे उपस्थित असून निवेदन दिले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १५/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी निवासी जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, यांचेकडे रविंद्र रामभाऊ कुंभारे उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय भंडारा, यांच्या संदर्भात एकूण तीन मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०३/०५२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या माध्यमातून त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे ती अपीलकर्ता यांना देण्यात आली आहे.

३. दि.२५/०३/२०१० रोजी तीनही मुद्यांच्या संदर्भात अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय उत्तर देण्यात आले आहे.मुद्या क्र. ३ मध्ये श्री आर. आर. कुंभारे यांची नायब तहसीलदार या पदावर नियुक्ती झाली आहे व ते जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे रुजू झाल्याची नोंद सेवापुस्तकात आहे. या कार्यालयास उपलब्ध असलेली २ पेजेस माहिती प्रति पेज रु. २/- प्रमाणे रु. ४/- व शिघ्र टपालाचे रु.२५/- असे एकूण रु. २९/- चा

अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे सांगितले. उर्वरीत दोन मुद्यांची माहिती श्री आर. आर. कुंभारे यांची नेमणूक जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली येथे झालेली असल्याने त्यांचे स्तरावर उपलब्ध होईल. त्यांचेकडून ती प्रत उपलब्ध करुन घ्यावी असेही त्यांना कळविलेले आहे. परंतू त्यानंतरही त्यांचेकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे दि. १५/०४/२०१० रोजी पुन्हा तीच माहिती कळविण्यात आली. दि. ०३/०५/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी रुपये ४/- शासनात जमा केले. व त्यांना उर्वरीत दोन मुद्यांची माहिती देण्यात आली. तसेच या संदर्भात मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना जिल्हाधिकारी भंडारा यांचे कार्यालयाचे पत्र दि.०५/०५/२०१० नुसार उर्वरीत दोन मुद्यांची माहिती श्री दुरुगकर यांना पुरविण्याबाबत विनंती करण्यात आली. जिल्हाधिकारी गडचिरोली यांना दि. ०५/०६/२०१० रोजी स्मरण पत्र सुध्दा दिले व दि.२४/०६/२०१० रोज दुरध्वनीवरुन संपर्क साधण्यात आला. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांचे दि. १९/०६/२०१० च्या पत्रानुसार, मागितलेल्या माहितीस २४ ते २५ वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. सदर माहिती अभिलेखात शोधण्यासाठी कार्यवाही सुरु असून माहिती प्राप्त होताच पुरविण्यात येईल असे कळविण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात विलंब झालेला नाही. जिल्हाधिकारी गडचिरोली यांचे कार्यालयातून माहिती प्राप्त झाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. ही बाब त्यांनी सुध्दा लेखी मान्य केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र....................दिनांक .......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ८६५/नाग/२०१०</u>**

१. श्री सुरेश शालिकराम दुरुगकर - **अपीलकर्ता**
श्रीनगर बब्बा भवनच्या जवळ, चंद्रशेखर वार्ड, गोंदिया
ता.जि. गोंदिया - ४४१६०१

**विरुध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक १६/०७/२०१०)**

**<u>निर्णय</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७/०६/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे निवडणूक कार्यवृत्त करीत असल्याने त्यांच्या तर्फे जनमाहिती अधिकारी हेच हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २५/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे सप्टेंबर २००९ चे APL तांदूळ गोंदिया शहर व ग्रामीण विभागात कोणकोणत्या स्वस्त धान्य दुकान दाराने शासनाच्या मालाचे चालान भरले होते तरीही माल मिळाला नाही, कोणकोणत्या गोडावून मधून तांदूळ उचलले, ज्यांनी APL तांदूळ उचलून चालान भरले त्यांना तो माल मिळालेला नाही, दूकानदाराने शासनाकडे चालान भरल्यानंतर सुध्दा त्यांना कोणत्या कारणास्तव वेळेवर गहु, तांदळाचा माल दिला जात नाही, दूकानातील गहू व तांदुळ लॅप्स होतात परंतू ते

लाभार्थीना वेळेवर दिले जात नाही, गोंदिया शहर व ग्रामीण भागातील स्वस्त धान्य दुकानाचे परवानाची छायांकित प्रत मिळावी. अशाप्रकारची एकूण ६ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती तात्काळ टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. २६/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दि.२५/०२/२०१० च्या अर्जानुसार सदरची माहिती ही गोडावूनशी संबंधीत असल्यामुळे गोडावून व्यवस्थापक श्री जी. आर. पारधी, अवल कारकून श्री सी. एम. रंगारी अन्न विभाग गोंदिया यांना माहिती पुरविण्यासाठी आदेश दिला. परंतू त्यानंतरही अपीलकर्ता यांना नेमकी कोणती व काय माहिती हवी आहे हे त्यांनी कळविले नाही म्हणून त्यांना दि.०८/०३/२०१० रोजी माहितीचे स्पष्टीकरण करावे असे पत्र दिले. सदर पत्र हे त्यांना दि. १२/०३/२०१० रोजी देण्यात आले. पून्हा मुद्येनिहाय पत्र दि. १५/०३/२०१० रोजी श्री पारधी गोडावून व्यवस्थापक अन्न माहिती अधिकारी गोंदिया विभाग यांना देण्यात आले. परंतू त्यांच्याकडून अद्यापपर्यंतची माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री एस. एन. वैकुंठी जनमाहिती अधिकारी तथा धान्य खरेदी विक्री निरिक्षक यांना दि. २९/०४/२०१० रोजी माहिती उपलब्ध न करुन दिल्याच्या संदर्भात सुनावणीस हजर राहावे असे कळविले. त्यानंतर पुन्हा त्यांनी दि.२६/०५/२०१० रोजी श्री वैकुंठी यांना त्यांचे तहसिलदार कार्यालय गोंदिया येथे कागदपत्रासहीत हजर रहावे, तसेच अपीलकर्तास माहिती पुरविली असल्यास त्याची पोच सादर करावी असे कळविले आहे. अपीलकर्ता यांना माहिती मिळवून देण्याकरीता धान्य खरेदी विक्री निरिक्षक श्री वैकुंठी यांनी, अव्वल कारकून श्री सी. एम. रंगारी यांना दि. २५/०२/२०१०, ०३/०३/२०१० व १५/०३/२०१० व गोडावून व्यवस्थापक श्री जी. आर. पारधी रामनगर गोंदिया यांना दि. २५/०२/२०१०, ०३/०३/२०१० व १५/०३/२०१० या तारखांना पत्र पाठविण्यात आले आहे. तरीसुध्दा श्री जी. आर. पारधी व श्री रंगारी यांना पत्र देवून सुध्दा त्यांनी अपीलकर्ता यांना माहिती पुरविली नाही असे अपीलकर्ता यांना दि.०८/०३/२०१० च्या पत्रान्वये श्री वैकुंठी यांनी कळविल्याचे नमूद केले आहे. या संदर्भात

दि.२६/०५/२०१० रोजी अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार गोंदिया यांना कळविलेले दिसते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारित करुन दिलेला दिसत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात गोडावून व्यवस्थापक श्री पारधी व अवर कारकून श्री रंगारी हे जबाबदार दिसून येतात. माहिती ही सदर कर्मचाऱ्यांकडे असल्याने अधिनियमाचे कलम २००५ (४) अन्वये माहिती पुरविण्यासाठी त्यांचे सहाय्य घेणे आवश्यक होते. त्यामुळे श्री पारधी व रंगारी यांना अधिनियमाचे कलम २००५ (५) अन्वये जनमाहिती अधिकारी समजणे आवश्यक आहे. त्यामुळे माहिती ही त्याप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये प्रत्येकास रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत गोडावून व्यवस्थापक श्री पारधी व अवल कारकून श्री रंगारी यांना मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता यांच्या दि.२५/०२/२०१० च्या अर्जानुसार विहीत मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २००५ (४) व (५) प्रमाणे गोडावून व्यवस्थापक श्री पारधी व अवल कारकून श्री रंगारी हे जनमाहिती अधिकारी समजण्यात येत असल्याने त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये प्रत्येकी रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून करण्यात येवून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...................दिनांक ......................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**